भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# अयोध्या येथील विवक्षित क्षेत्र संपादन अधिनियम, १९९३

**(१९९३ चा अधिनियम क्रमांक ३३)**

[ १९ मार्च, २००४ रोजी यथाविद्यमान ]

# The Acquisition of Certain Area at Ayodhya Act, 1993

**( Act No. 33 of 1993 )**

[ *As in force on the 19th March, 2004* ]


संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

२००७

[ **किंमत :** रुपये १२.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत दिनांक १९ मार्च २००४ रोजी यथाविद्यमान असलेला दि ॲक्वीझिशन ऑफ सर्टन एरिया ॲक्ट अयोध्या याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १३, अंक २, दिनांक १४ ऑक्टोबर २००४ यात पृष्ठ २०८ ते २१५ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक १४ ऑक्टोबर २००४.

**टी. के. विश्वनाथन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the The Acquisition of Certain Area at Ayodhya Act, 1993 as on the 19th March 2004 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 2, Vol. 13, dated 14th October 2004 on pages 208 to 215.

This authoritative text was published under the authority of the president under section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 14th October 2004.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the Government of India.

# अयोध्या येथील विवक्षित क्षेत्र संपादन अधिनियम, १९९३

**कलमांचा क्रम**


**कलमे.**

प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व प्रारंभ.

२. व्याख्या.

प्रकरण दोन

**अयोध्येतील क्षेत्राचे संपादन**

३. विवक्षित क्षेत्राबाबतच्या हक्कांचे संपादन.

४. निहित होण्याचा सर्वसाधारण परिणाम.

५. क्षेत्राच्या व्यवस्थापनाची प्रभारी असलेली व्यक्ती किंवा राज्य शासन यांचे सर्व मत्ता, इत्यादी सुपूर्द करण्याचे कर्तव्य.

६. कोणत्याही अन्य प्राधिकरणाकडे किंवा निकायाकडे किंवा न्यासाकडे क्षेत्र निहित करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.

प्रकरण तीन

**मालमत्तेचे व्यवस्थापन व प्रशासन**

७. सरकारकडून मालमत्तेचे व्यवस्थापन.

प्रकरण चार

**संकीर्ण**

८. रकमेचे प्रदान.

९. इतर सर्व अधिनियमितींवर अधिनियम अधिभावी असणे.

१०. शास्ती.

११. सद्‌भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.

१२. नियम करण्याचा अधिकार.

१३. निरसन व व्यावृत्ती.

**अनुसूची.**

# अयोध्या येथील विवक्षित क्षेत्र संपादन अधिनियम, १९९३

**(१९९३ चा अधिनियम क्रमांक ३३)**

(१९ मार्च, २००४ रोजी यथाविद्यमान)

[३ एप्रिल, १९९३]

**अयोध्या येथील विवक्षित क्षेत्र संपादन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित आणि आनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** उत्तर प्रदेश राज्याच्या फैजाबाद जिल्ह्यातील फैजाबाद सदर तहसिलाच्या हवेली अवध परगण्यामध्ये अयोध्येत असलेल्या कोटरामचंद्र खेड्यातील सामान्यतः रामजन्मभूमी-बाबरी मशीद म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बांधकामाबाबत (यात अशा बांधकामाच्या आतील व बाहेरील अंगणाचा परिसरही अंतर्भूत आहे) दीर्घ काळापासून वाद चालू आहे ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त वादामुळे देशातील नागरी व्यवस्था आणि निरनिराळ्या समाजांमधील सामंजस्य यांना बाधा पोहचलेली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** नागरी व्यवस्था अबाधित राखणे आणि भारतीय जनतेमध्ये सलोखा आणि बंधुभाव निर्माण करणे आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** पूर्वोक्त उद्दिष्टये साध्य करण्याच्या दृष्टीने, अयोध्या येथील विवक्षित क्षेत्रे संपादित करणे आवश्यक आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चव्वेचाळिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास, अयोध्या येथील विवक्षित क्षेत्र संपादन अधिनियम, १९९३, असे म्हणावे.

(२) तो ७ जानेवारी, १९९३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

**व्याख्या.**

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " क्षेत्र " याचा अर्थ, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेले (सर्व इमारती बांधकाम किंवा त्यात समाविष्ट असलेली इतर संपत्ती यांसह) क्षेत्र, असा आहे ;

(ख) " प्राधिकृत व्यक्ती " याचा अर्थ, केंद्र सरकारने कलम ७ अन्वये प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्ती-निकाय किंवा कोणत्याही न्यासाचा विश्वस्त, असा आहे ;

(ग) " हक्कमागणी आयुक्त " याचा अर्थ, कलम ८ च्या पोटकलम (२) अन्वये नियुक्त केलेला हक्कमागणी आयुक्त, असा आहे ;

(ग) " विहित " याचा अर्थ या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे.

## प्रकरण दोन

### अयोध्येतील क्षेत्राचे संपादन

**विवक्षित क्षेत्राबाबतच्या हक्कांचे संपादन.**

**३.** या अधिनियमाच्या प्रारंभी व तेव्हापासून क्षेत्राच्या संबंधातील हक्क, मालकी हक्क आणि हितसंबंध हे, या अधिनियमाला अनुलक्षून केंद्र सरकारकडे संक्रामित आणि निहित होतील.

**निहित होण्याचा सर्वसाधारण परिणाम.**

**४.** (१) क्षेत्रामध्ये, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी एखाद्या व्यक्तीच्या किंवा, यथास्थिति, उत्तर प्रदेशाच्या राज्य शासनाच्या मालकीची, ताब्यातील अधिकाराच्या अधीन किंवा नियंत्रणाखाली असलेली सर्व मत्ता, हक्क, पट्टेदारी, अधिकार, प्राधिकार आणि विशेषाधिकार आणि सर्व स्थावर व जंगम मालमत्ता, तसेच जमिनी, इमारती, बांधकामे कोणत्याही प्रकारची दुकाने किंवा इतर मालमत्ता आणि त्यातील किंवा त्यापासून निर्माण होणारे इतर सर्व हक्क व हितसंबंध आणि सर्व संबंधित नोंदवह्या, नकाशे, आरेखने, संकल्पचित्रे व त्याच्याशी संबंधित कोणत्याही प्रकारचे इतर दस्तऐवज अंतर्भूत आहेत असे मानण्यात येईल.

(२) कलम ३ अन्वये केंद्र सरकारकडे निहित केलेली पूर्वोक्त सर्व मालमत्ता अशी निहित झाल्यामुळे, कोणतेही दायित्व, आबंधन, गहाण, भार, धारणाधिकार आणि त्यावर परिणाम करणारे इतर सर्व भार, यांपासून मुक्त होईल किंवा उन्मुक्त केली जाईल आणि त्या मालमत्तेच्या वापरावर कोणत्याही प्रकारे निर्बंध घालणारी किंवा

अशा मालमत्तेसंबंधात संपूर्णतः किंवा तिच्या काही भागापुरता धारक नेमणारी कोणत्याही न्यायालयाची किंवा न्यायाधिकरणाची किंवा प्राधिकरणाची कोणतीही जप्ती, व्यादेश, हुकूमनामा किंवा आदेश निष्प्रभावी होतील.

(३) या अधिनियमाच्या प्रारंभास जर, कलम ३ अन्वये केंद्र सरकारकडे निहित असलेल्या मालमत्तेच्या बाबतीतील हक्क, मालकी हक्क किंवा हितसंबंध याबाबतचा कोणतीही दावा, अपील किंवा अन्य कार्यवाही कोणत्याही न्यायालयासमोर, न्यायधिकरणासमोर किंवा इतर प्राधिकरणासमोर प्रलंबित असेल तर, ती समाप्त होईल.

**क्षेत्राच्या व्यवस्थापनाची प्रभारी असलेली व्यक्ती किंवा राज्य शासन यांचे सर्व मत्ता, इत्यादी सुपूर्द करण्याचे कर्तव्ये.**

**५.** (१) केंद्र सरकार, कलम ३ अन्वये केंद्र सरकारकडे निहित झालेल्या क्षेत्राचा ताबा मिळवण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करू शकेल.

(२) कलम ३ अन्वये केंद्र सरकारकडे ते क्षेत्र निहित झाल्यानंतर अशा निहित होण्याच्या लगतपूर्वी क्षेत्राच्या व्यवस्थापनाची प्रभारी असलेली व्यक्ती किंवा, यथास्थिति, उत्तर प्रदेशाचे राज्य शासन याने, अशा निहित होण्याच्या संबंधातील त्याच्या ताब्यात असलेली सर्व मत्ता, नोंदवह्या आणि इतर दस्तऐवज केंद्र सरकारकडे किंवा प्राधिकृत व्यक्तीकडे सुपूर्द करणे त्याच्यावर बंधनकारक असेल आणि जेव्हा अशा नोंदवह्या किंवा दस्तऐवज तसे सुपूर्द करणे शक्य नसेल तेव्हा त्या नोंदवह्यांच्या किंवा दस्तऐवजांच्या अधिप्रमाणित प्रती विहित रीतीने सुपूर्द करण्यात येतील.

**कोणत्याही अन्य प्राधिकारणाकडे किंवा निकायाकडे किंवा न्यासाकडे क्षेत्र निहित करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.**

**६.** (१) कलमे ३, ४, ५ आणि ७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकार, जर त्याची अशी खात्री झाली की, ह्या अधिनियमाच्या प्रारंभी किंवा प्रारंभानंतर स्थापन केलेले अन्य कोणतेही प्राधिकरण किंवा अन्य निकाय किंवा कोणत्याही न्यासाचा विश्वस्त हा, शासनास ज्या लादणे योग्य वाटतील अशा अटी व शर्तींचे अनुपालन करीत आहे किंवा करण्यास राजी आहे तर, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, असा निदेश देऊ शकेल की, असे क्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग याच्या संबंधातील हक्क, मालकी हक्क आणि हितसंबंध किंवा त्यातील काहीही, या प्रकारे केंद्र सरकारकडे निहित होणे चालू राहण्याऐवजी, ते प्राधिकरण किंवा निकाय किंवा न्यास यांच्याकडे एकतर अधिसूचनेच्या तारखेला किंवा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा त्या नंतरच्या तारखेला, निहित होतील.

(२) जेव्हा एखाद्या क्षेत्राच्या किंवा त्याच्या भागाच्या संबंधातील कोणताही हक्क, मालकी हक्क व हितसंबंध पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणाकडे, निकायाकडे, किंवा न्यासाकडे निहित झालेला असेल तेव्हा, असे क्षेत्र किंवा त्याच्या भागाच्या संबंधातील केंद्र सरकारचा असा हक्क, अशा निहित होण्याच्या तारखेस किंवा तारखेपासून त्या प्राधिकरणाचा, निकायाचा किंवा न्यासाच्या विश्वस्ताचा हक्क झाला आहे, असे मानण्यात येईल.

(३) कलमे ४, ५, ७ आणि ११ च्या तरतुदी जसे केंद्र सरकारच्या संबंधात लागू होतात तसेच त्या, शक्य होईल तितपत असे प्राधिकरण, निकाय किंवा विश्वस्त यांच्या संबंधात लागू होतील आणि या प्रयोजनासाठी त्यातील केंद्र सरकारच्या निर्देशांचा अर्थ, असे प्राधिकरण, निकाय किंवा न्यासाचे विश्वस्त यांचा निर्देश असल्याप्रमाणे लावला जाईल.

## प्रकरण तीन

## **मालमत्तेचे व्यवस्थापन व प्रशासन**

**सरकारकडून मालमत्तेचे व्यवस्थापन.**

**७.** (१) कोणत्याही संविदेत किंवा संलेखात किंवा कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या किंवा अन्य प्राधिकरणाच्या आदेशात एतदविरूद्ध काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, या अधिनियमाच्या प्रारंभास व तेव्हापासून, कलम ३ अन्वये केंद्र सरकाकडे निहित असलेल्या मालमत्तेचे व्यवस्थापन, केंद्र सरकारकडून किंवा त्या शासनाकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या एखाद्या व्यक्तीकडून, व्यक्ती निकायाकडून किंवा एखाद्या न्यासाच्या विश्वस्ताकडून करण्यात येईल.

(२) कलम ३ अन्वये केंद्र सरकारकडे निहित असलेल्या मालमत्तेचे व्यवस्थापन करताना केंद्र सरकार किंवा प्राधिकृत व्यक्ती, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, उत्तर प्रदेश राज्याच्या फैजाबाद जिल्ह्यातील फैजाबाद सदर तहसिलाच्या हवेली अवध परगण्यामध्ये अयोध्येत असलेल्या कोटरामचंद्र खेड्यातील ज्या क्षेत्रामध्ये, सामान्यतः रामजन्मभूमी-बाबरी मशीद या नावाने संबोधले जाते, असे बांधकाम (यात अशा बांधकामाच्या आतील व बाहेरील अंगणाचा परिसरही अंतर्भूत आहे) ज्या स्थितीत उभे होते ते त्याच स्थितीत राखले जाईल याची खातरजमा करून घेईल.

## प्रकरण चार

## **संकीर्ण**

**रकमेचे प्रदान.**

**८.** (१) त्या क्षेत्रामध्ये समाविष्ट असलेली कोणतीही जमीन, इमारत, संरचना किंवा अन्य मालमत्ता यांच्या मालकाला, कलम ३ अन्वये अशी जमीन, इमारत, संरचना यांचे हस्तांतरण करण्याबद्दल आणि ती जमीन, इमारत, संरचना किंवा अन्य मालमत्ता त्या सरकारकडे निहित करण्याबद्दल, केंद्र सरकारकडून त्या जमिनीचे, इमारतीचे संरचनेचे किंवा इतर मालमत्तेचे जे बाजार मूल्य असेल त्या रकमेएवढी रोख रक्कम देण्यात येईल.

(२) केंद्र सरकार, मालकाच्या हक्कमागणीचा किंवा पोटकलम (१) अन्वये मालकाविरुद्ध हक्कमागणी केली असेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या हक्कमागणीचा निर्णय करण्याच्या प्रयोजनासाठी राजपत्रातील अधिसूचनेद्वारे हक्कमागणी आयुक्त नियुक्त करील.

(३) हक्कमागणी आयुक्त, अशा हक्कमागण्या स्वीकारण्यासाठी व त्यांचा निर्णय करण्यासाठी स्वत:ची कार्यपद्धती विनियमित करील.

(४) मालक किंवा मालकाविरुद्ध हक्कमागणी केली असेल अशी कोणतीही व्यक्ती या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या कालावधीत, हक्कमागणी आयुक्ताकडे हक्कमागणी दाखल करू शकेल :

परंतु हक्कमागणी आयुक्ताची अशी खात्री पटली की, हक्कमागणी करणाऱ्यास उक्त नव्वद दिवसांच्या कालावधीत हक्कमागणी दाखल करण्यास, प्रतिबंध होण्यास पुरेसे कारण होते, तर हक्कमागणी आयुक्त पुढील नव्वद दिवसांच्या कालावधीत हक्कमागणी दाखल करून घेईल परंतु, त्यानंतर दाखल करून घेणार नाही.

**इतर सर्व अधिनियमितींवर अधिनियम अधिभावी असणे.**

**९.** त्या त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात किंवा या अधिनियमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कायाद्याद्वारे प्रभावित असलेल्या कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायाधिकरण्याच्या किंवा अन्य प्राधिकरणाच्या हुकुमनाम्यात किंवा आदेशात काहीही विसंगत असले तरी, या अधिनियमाच्या तरतुदी प्रभावी ठरतील.

**शास्ती.**

**१०.** जी व्यक्ती क्षेत्र व्यवस्थापनाची प्रभारी आहे जिने, केंद्र सरकार किंवा अन्य प्राधिकृत व्यक्ती यांच्याकडे, त्या क्षेत्रासंबधातील तिच्या ताब्यात असलेली कोणतीही मत्ता, नोंदवही किंवा अन्य दस्तऐवज किंवा, यथास्थिति, अशा नोंदणीच्या किंवा दस्तऐवजाच्या अधिप्रमाणित प्रती सुपूर्द करण्यात कसूर केली आहे अशी व्यक्ती, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा दहा हजारांपर्यंत असू शकेल एवढ्या रकमेच्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र राहील.

**सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.**

**११.** या अधिनियमान्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा हेतू असलेल्या अशा कृत्याबद्दल केंद्र सरकार किंवा प्रधिकृत व्यक्ती किंवा त्या सरकारचे किंवा प्राधिकृत व्यक्तीचे, कोणतेही अधिकारी किंवा अन्य कर्मचारी यांच्याविरूद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

**नियम करण्याचा अधिकार.**

**१२.** (१) केंद्र सरकार, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करील.

(२) केंद्र सरकारने, या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहाचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा फेरबद्दल केलेल्या रूपातच परिणामक होईल किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

**निरसन व व्यावृत्ती.**

**१३.** (१) पोटकलम (२) च्या तरतुदींच्या अधीनतेने येथील विवक्षित क्षेत्र संपादन अध्यादेश, १९९३ (१९९३ चा अध्यादेश ८) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) उक्त अध्यादेशामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी,—

(क) उक्त अध्यादेशाच्या अनुसूचीमधील अनुक्रमांक १ समोरील विनिर्दिष्ट गाव कोटरामचंद्र असलेल्या भूखंड क्रमांक २४२ च्या संबंधातील हक्क, मालकीहक्क व हितसंबंध केंद्र सरकारकडे कधीच हस्तांतरित व निहित करण्यात आलेले नाहीत असे समजण्यात येईल ;

(ख) उक्त भूखंड क्रमांक २४२ च्या संबंधातील हक्क, मालकीहक्क व हितसंबंध याबाबत कोणत्याही न्यायालयाकडे, न्यायाधिकरणाकडे किंवा अन्य प्राधिकरणाकडे कोणताही दावा, अपील किंवा अन्य कार्यवाही प्रलंबित असल्यास, ती कधीच समाप्त करण्यात आलेली नाही असे समजण्यात येईल व असा दावा, अपील किंवा अन्य कार्यवाही (ज्यामध्ये त्याबाबतचा कोणत्याही न्यायालयाचा आदेश किंवा अंतरिम आदेश यांचा अंतर्भाव आहे) उक्त अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी ज्या स्थितीत होती त्याच स्थितीत पूर्ववत करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

(ग) उक्त भूखंड क्रमांक २४२ च्या संबंधात त्या अध्यादेशान्वये करण्यात आलेली अन्य कोणतीही कार्यवाही किंवा गोष्ट ही, कधीच करण्यात आलेली नव्हती, असे समजण्यात येईल.

(३) असे निरसन करण्यात आलेले असले तरी, उक्त अध्यादेशाअन्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कार्यवाही या आधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

## अनुसूची

[कलम २ (क) पहा]

### क्षेत्राचे वर्णन

| अनुक्रमांक | गाव/परगणा/तहसील/जिल्हा/ राज्याचे नाव | महसूल (खासरा) भूखंड क्रमांक | संपादित करावयाचे क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | बिघा | बिस्वा | बिस्वांसी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | कोटरामचंद्र गाव, हवेली अवध परगणा, फैजाबाद सदर तहसील, जिल्हा फैजाबाद, उत्तर प्रदेश. | १४३ | ० | ९ | ० |
| | | १४४ | ० | ७ | ० |
| | | १४५ | ० | ८ | ० |
| | | १४६ | १ | ६ | ७ |
| | | १४७ | ५ | ८ | ० |
| | | १५८ | ० | ४ | ० |
| | | १५९ | ० | १३ | ८ |
| | | १६० | ५ | १३ | ० |
| | | १६१ | ० | १८ | ० |
| | | १६२ | १ | ८ | ७ |
| | | १६८ | १ | २ | ० |
| | | १६९ | १ | ७ | ० |
| | | १७० | ० | ८ | ० |
| | | १७१ | १ | ७ | ० |
| | | १७२ | २ | ७ | ० |
| | | १७३ | ० | १८ | ० |
| | | १७४ | ० | ३ | ० |
| | | १७५ | ० | ६ | ० |
| | | १७६ | १ | २ | ० |
| | | १७७ | ० | १६ | ० |
| | | १७८ | ० | १० | ० |
| | | १७९ | ० | १४ | ० |
| | | १८० | ० | १४ | ५ |
| | | १८१ | ० | १३ | १० |
| | | १८२ | ० | ७ | ५ |
| | | १८३ | ० | ७ | ५ |
| | | १८४ | ० | ६ | ० |
| | | १८५ | ० | ७ | ५ |
| | | १८६ | ० | ६ | १० |
| | | १८७ | ० | ७ | ० |
| | | १८८ | ० | १८ | १५ |
| | | १८९ | ० | १४ | ० |
| | | १९० | ० | ४ | ० |
| | | १९१ | ४ | ६ | १४ |
| | | १९२ | ० | ७ | ० |
| | | १९३ | ० | १२ | ० |
| | | १९४ | ४ | १९ | ० |
| | | १९५ | ० | ५ | ० |
| | | १९६ | ० | ५ | ० |
| | | १९७ | ० | ५ | ० |
| | | १९८ | ० | ३ | ० |
| | | १९९ | ० | १२ | ० |
| | | २०० | २ | ० | ० |
| | | २०४ | ० | ३ | ० |
| | | (भाग) | | | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | दक्षिणेस भूखंड क्रमांक २२२ पश्चिमेस भूखंड क्रमांक २०५ आणि पूर्वेस भूखंड क्रमांक २३१ यांच्याद्वारे सिमित. | २०५ | ० | १० | ० |
| | | ३०६ | ० | ५ | ० |
| | | २०७ | ० | १९ | ० |
| | | २०८ | ० | ५ | ० |
| | | २०९ | १ | ११ | ० |
| | | २१० | ० | ८ | ० |
| | | २११ | ० | १३ | ० |
| | | २१२ | ० | ४ | १४ |
| | | २१३ | १ | १९ | १५ |
| | | २१४ | ० | ६ | ० |
| | | २१५ | ० | २ | ५ |
| | | २१६ | ० | ६ | ० |
| | | २१७ | ० | ११ | ० |
| | | २१८ | ० | ३ | ० |
| | | २१९ | १ | ६ | ५ |
| | | २२० | ० | १२ | ० |
| | | २२१ | १ | २ | १५ |
| | | २२२ | ० | ५ | ७ |
| | | २२३ | ५ | ६ | ० |
| | | २२४ | १ | ० | ० |
| | | २२५ | ० | ११ | १५ |
| | | २२६ | ० | १० | ५ |
| | | २२७ | ० | ७ | ५ |
| | | २२८ | ० | ५ | ० |
| | | २२९ | ० | ११ | १० |
| | | २३० | ० | २ | १० |
| | | २३१ | १ | १ | १० |
| | | २३२ | ० | २ | ० |
| | | २३३ | ० | २ | ० |
| | | २३४ | १ | १२ | ० |
| | | २३५ | ० | १० | ० |
| | | २३६ | ० | ४ | ० |
| | | २३७ | ० | १ | ० |
| | | २३८ | १ | ६ | ० |
| | | २३९ | २ | १ | ० |
| | | २४४ (भाग) | ० | १४ | १० |
| | उत्तरेस अंशतः भूखंड क्र. २४० व अंशत : भूखंड क्र. २४३, पश्चिमेस अंशत : भूखंड क्र. २३९ व अंशतः भूखंड क्र. २४० व दक्षिणेस भूखंड क्र. २४६ यांच्याद्वारे सिमित. | | | | |
| | | २४६ (भाग) | ० | १८ | ० |
| | दक्षिणेस भूखंड क्र. २३८, पश्चिमेस भूखंड क्र. २३९ व उत्तरेस भूखंड क्र. २४४ याद्वारे सिमित. | | | | |
| | | | ७५ | १४ | ७ |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| २ | अवधखास गाव, हवेली अवध परगणा, | ११०४ | ० | ११ | १७ |
| | फैजाबाद सदर तहसील, | ११०५ | ० | ७ | १४ |
| | जिल्हा फैजाबाद, उत्तर प्रदेश. | ११०६ | ० | ६ | २ |
| | | ११०७ | ० | १४ | १४ |
| | | ११०८ | ० | ४ | ३ |
| | | ११०९ | ० | ३ | ० |
| | | १११० | ० | ४ | ५ |
| | | ११११ | ० | १२ | १५ |
| | | १११२ | ० | ५ | ८ |
| | | १११३ | ० | ५ | १० |
| | | १११४ | ० | ० | १० |
| | | १११५ | ० | १ | १० |
| | | १११६ | ० | ३ | १० |
| | | १११७ | ० | ९ | १२ |
| | | १११८ | १ | १ | १७ |
| | | १११९ | ० | ७ | १४ |
| | | ११२० | ० | १३ | १५ |
| | | ११२१ | ० | ३ | ० |
| | | ११२२ | ० | ८ | ० |
| | | ११२३ | ० | ८ | ० |
| | | ११२४ | ० | ९ | १० |
| | | ११२५ | ० | ६ | ६ |
| | | ११२६ | ० | ४ | १५ |
| | | ११२७ | ० | ११ | ४ |
| | | ११२८ | १ | १२ | ६ |
| | | ११२९ | ० | ५ | ९ |
| | | ११३० | ० | ५ | ० |
| | | ११३२ | १ | ३ | ५ |
| | | ११३३ | ० | ४ | १५ |
| | | ११३४ | ० | ४ | ० |
| | | ११३५ | ० | १ | ० |
| | | ११३६ | ० | ९ | ० |
| | | ११४३ | ० | ४ | ५ |
| | | ११४४ | ० | ५ | १५ |
| | | ११४५ | ० | ० | १५ |
| | | ११४६ | ० | ३ | ० |
| | | ११४७ | ० | ५ | ० |
| | | ११४८ | ० | ७ | १५ |
| | | ११४९ | ० | ६ | १० |
| | | ११६६ (भाग) | ० | ६ | ० |
| | पूर्वेस भूखंड क्र.१२०३, पश्चिमेस | १२०६ | ० | ७ | ० |
| | भूखंड क्र. ११५१ व दक्षिणेस | १२१० | ० | १ | ५ |
| | भूखंड क्र. ११६७ याद्वारे सिमित. | १२११ | ० | २ | ५ |
| | | १२१२ | ० | ११ | ५ |
| | | १२१३ | ० | २ | १० |
| | | १२१४ | ० | ७ | ० |
| | | १२१५ | ० | ० | १५ |
| | | १२१६ | ० | ० | १५ |
| | | १२१७ | ० | ३ | ५ |
| | | १२१८ | ० | ४ | १० |
| | | १२१९ | ० | ५ | ० |
| | | १२२० | ० | ७ | ५ |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | १२२१ | ० | ११ | १० |
| | | १२२२ | ० | ४ | ० |
| | | १२२३ | ० | १ | १५ |
| | | १२२५ | ० | १२ | १५ |
| | | १२२६ | ० | ८ | १० |
| | | १२२७ | ० | ७ | १५ |
| | | १२२८ | ० | ४ | १५ |
| | | १२२९ | ० | १ | ० |
| | | १२३० | ० | १३ | ५ |
| | | १२३१ | ० | ७ | ५ |
| | | १२३२ | ० | १ | ६ |
| | | १२३३ | ० | ४ | १५ |
| | | १२३४ | ० | ७ | ५ |
| | | १२३५ | ० | १ | ६ |
| | | १२३६ | ० | २ | ५ |
| | | १२३७ | ० | ९ | १० |
| | | १२३८ | ० | १ | १८ |
| | | १२३९ | ० | १ | १० |
| | | १२४० | ० | ८ | १५ |
| | | १२४१ | ० | १ | १० |
| | | १२४२ | ० | १ | १५ |
| | | १२४३ | ० | २ | ० |
| | | १२४७ (भाग) | ० | ५ | ० |
| | उत्तरेस भूखंड क्र. १२४८, दक्षिणेस भूखंड क्र. १२४६ व पूर्वेस / मार्गावर भूखंड क्र. १२९१ याद्वारे सिमित. | १२४८ | १ | ७ | १० |
| | | १२४९ | ० | ० | १३ |
| | | १२५० | ० | ७ | ७ |
| | | १२५१ | ० | ८ | ० |
| | | १२५२ | ० | ९ | ० |
| | | १२५३ | ० | १२ | १० |
| | | १२५४ | ० | ४ | ० |
| | | १२५५ | ० | २ | ० |
| | | १२५६ | ० | २ | ० |
| | | १२५७ | ० | २ | १० |
| | | १२५८ | ० | २ | ५ |
| | | १२५९ | ० | १ | १० |
| | | | २७ | ०० | ११ |
| ३. | गाव जलवानपूर, हवेली अवध परगणा, तहसील फैजाबाद सदर, जिल्हा फैजाबाद, उत्तर प्रदेशः | १ | ० | ३ | ५ |
| | | २ | १ | १ | ० |
| | | ३ | ० | ० | ५ |
| | | ४ | १ | ९ | १५ |
| | | ५ | ० | ० | १० |
| | | ६ | ० | १९ | १० |
| | | ७ | ० | २ | १५ |
| | | ८ | ० | ४ | १५ |
| | | ९ | ० | १० | १० |
| | | १० | ० | ० | १० |
| | | ११ | ० | ३ | ० |
| | | १२ | ० | १४ | ५ |
| | | १३ | ० | १० | ० |
| | | १४ | ० | ० | १० |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | १५ | ० | १५ | १५ |
| | | १६ | ० | ८ | १५ |
| | | १७ | ० | ३ | १५ |
| | | १८ | ० | ६ | ५ |
| | | १९ | ० | ७ | ५ |
| | | २७ | १ | ६ | ० |
| | | | ९ | ७ | १५ |

# THE ACQUISITION OF CERTAIN AREA AT AYODHYA ACT, 1993

## अयोध्या येथील विवक्षित क्षेत्र संपादन अधिनियम, १९९३

इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| acquisition | संपादन | [title] |
| administration | प्रशासन | [chapter III-title] |
| affected | बाधा | [preamble] |
| annulment | शून्यीकरण | [sec 12 (*2*)] |
| appeal | अपील | [sec 4 (*3*)] |
| area | क्षेत्र | [preamble] |
| attachment | जप्ती | [sec 4(*2*)] |
| authenticated | अधिप्रमाणित | [sec 5(*2*)] |
| authorised person | प्राधिकृत व्यक्ती | [sec 2(*b*)] |
| authority | प्राधिकरण | [sec 7(*1*)] |
| | प्राधिकार | [sec 4(*1*)] |
| body of persons | व्यक्ती निकाय | [sec 7(*1*)] |
| bound | बंधनकारक | [sec 5(*2*)] |
| brotherhood | बंधुभाव | [preamble] |
| building | इमारत | [sec 4(*1*)] |
| cease | निष्प्रभावी | [sec 4(2)] |
| certain | विवक्षित | [title] |
| charge | भार | [sec 4(*2*)] |
| claim | हक्कमागणी | [sec 8(*2*)] |
| claims commissioner | हक्कमागणी आयुक्त | [sec 2(*c*)] |
| commissioner | आयुक्त | [sec 8(*2*)] |
| connected | आनुषंगिक | [preamble] |
| contained | अंतर्भूत | [sec 7(*1*)] |
| contract | संविदा | [sec 7(*1*)] |
| decree | हुकूमनामा | [sec 4(*2*)] |
| discharged | उन्मुक्त | [sec 4(*2*)] |
| document | दस्तऐवज | [sec 5(*2*)] |
| drawing | संकल्पचित्रे | [sec 4(*1*)] |
| ensure | खातरजमा | [sec 7(*2*)] |
| freed | मुक्त | [sec 4(*2*)] |
| harmony | सलोखा | [preamble] |
| | सामंजस्य | [preamble] |
| immovable | जंगम | [sec 4(*1*)] |
| in force | अंमलात असणे | [sec 1(*2*)] |

| | | |
|---|---|---|
| injunction | व्यादेश | [sec 4(*2*)] |
| instrument | संलेख | [sec 7(*1*)] |
| Interest | हितसंबंध | [sec 3] |
| leasehold | पट्टेदारी | [sec 4(*1*)] |
| lien | धारणाधिकार | [sec 4(*2*)] |
| maintain | अबाधित राखणे | [preamble] |
| management | व्यवस्थापन | [chapter III-title] |
| map | नकाशा | [sec 4(*1*)] |
| market value | बाजार मूल्य | [sec 8(*1*)] |
| modification | फेरबदल | [sec 12(*2*)] |
| mortgage | गहाण | [sec 4(*2*)] |
| movable | स्थावर | [sec 4(*1*)] |
| obligation | आबंधन | [sec 4(*2*)] |
| order | आदेश | [sec 4(*2*)] |
| plan | आरेखन | [sec 4(*1*)] |
| prescribed | विहित | [sec 2(*c*)] |
| privilege | विशेषाधिकार | [sec 4(*1*)] |
| property | मालमत्ता | [Chapter III-title] |
| public order | नागरी व्यवस्था | [preamble] |
| registers | नोंदवह्या | [sec 4(*1*)] |
| relating | संबंधित | [sec 4(*1*)] |
| repeal | निरसन | [sec 13(*3*)] |
| restriction | निर्बंध | [sec 4(*2*)] |
| right | हक्क | [sec 4(*1*)] |
| structure | बांधकाम | [sec 4(*1*)] |
| transferred | संक्रामित | [sec 3] |
| tribunal | न्यायाधिकरण | [sec 7(*1*)] |
| trust | न्यास<br>दायित्व | [sec 2(*b*)]<br>[sec 4(*2*)] |
| suit | दावा | [sec 4(*3*)] |
| trustee | विश्वस्त | [sec 2(*b*)] |
| valid | विधिग्राह्य | [sec 12(*2*)] |
| vest in | निहित | [sec 3] |
| virtue | अनुलक्षून | [sec 3] |

## अयोध्या येथील विवक्षित क्षेत्र संपादन अधिनियम, १९९३

## THE ACQUISITION OF CERTAIN AREA AT AYODHYA ACT, 1993

मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिप्रमाणित | authenticated | [ कलम ५(२) ] |
| अनुलक्षून | virtue | [ कलम ३ ] |
| अपील | appeal | [ कलम ४(३) ] |
| अबाधित राखणे | maintain | [ उद्देशिका ] |
| आदेश | order | [ कलम ४(२) ] |
| आनुषंगिक | connected | [ उद्देशिका ] |
| आबंधन | obligation | [ कलम ४(२) ] |
| आयुक्त | commissioner | [ कलम ८(२) ] |
| आरेखन | plan | [ कलम ४(१) ] |
| अंतर्भूत | contained | [ कलम ७(१) ] |
| अंमलात असणे | in force | [ कलम १(२) ] |
| इमारत | building | [ कलम ४(१) ] |
| उन्मुक्त | discharged | [ कलम ४(२) ] |
| क्षेत्र | area | [ उद्देशिका ] |
| खातरजमा | ensure | [ कलम ७(२) ] |
| गहाण | mortgage | [ कलम ४(२) ] |
| जप्ती | attachment | [ कलम ४(२) ] |
| जंगम | immovable | [ कलम ४(१) ] |
| दस्तऐवज | document | [ कलम ५(२) ] |
| दायित्व | trust | [ कलम ४(२) ] |
| दावा | suit | [ कलम ४(३) ] |
| धारणाधिकार | lien | [ कलम ४(२) ] |
| नकाशा | map | [ कलम ४(१) ] |
| नागरी व्यवस्था | public order | [ उद्देशिका ] |
| निरसन | repeal | [ कलम १३(३) ] |
| निर्बंध | restriction | [ कलम ४(२) ] |
| निष्प्रभावी | cease | [ कलम ४(२) ] |
| निहित | vest in | [ कलम ३ ] |
| न्यायाधिकरण | tribunal | [ कलम ७(१) ] |
| न्यास | trust | [ कलम २(ख) ] |
| नोंदवह्या | registers | [ कलम ४(१) ] |
| पट्टेदारी | leaseholds | [ कलम ४(१) ] |
| प्रशासन | administration | [ प्रकरण तीन-शीर्षक ] |
| प्राधिकरण | authority | [ कलम ७(१) ] |
| प्राधिकार | authority | [ कलम ४(१) ] |

| | | |
|---|---|---|
| प्राधिकृत व्यक्ती | authorised person | [ कलम २(ख) ] |
| फेरबदल | modification | [ कलम १२(२) ] |
| बाजार मूल्य | market value | [ कलम ८(१) ] |
| बाधा | affected | [ उद्देशिका ] |
| बंधनकारक | bound | [ कलम ५(२) ] |
| बंधुभाव | brotherhood | [ उद्देशिका ] |
| बांधकाम | structure | [ कलम ४(१) ] |
| भार | charge | [ कलम ४(२) ] |
| मालमत्ता | property | [ प्रकरण तीन-शीर्षक ] |
| मुक्त | freed | [ कलम ४(२) ] |
| विधिग्राह्य | valid | [ कलम १३२(२) ] |
| विवक्षित | certain | [ शीर्षक ] |
| विशेषाधिकार | privilege | [ कलम ४(१) ] |
| विश्वस्त | trustee | [ कलम २(ख) ] |
| विहित | prescribed | [ कलम २(ग) ] |
| व्यक्ती निकाय | body of person's | [ कलम ७(१) ] |
| व्यवस्थापन | management | [ प्रकरण तीन-शीर्षक ] |
| व्यादेश | injunction | [ कलम ४(२) ] |
| शून्यीकरण | annulment | [ कलम १२(२) ] |
| सलोखा | harmony | [ उद्देशिका ] |
| सामंजस्य | harmony | [ उद्देशिका ] |
| संकल्पचित्रे | drawing | [ कलम ४(१) ] |
| संक्रामित | transferred | [ कलम ३ ] |
| संपादन | acquisition | [ शीर्षक ] |
| संबंधित | relating | [ कलम ४(१) ] |
| संलेख | instrument | [ कलम ७(१) ] |
| संविदा | contract | [ कलम ७(१) ] |
| स्थावर | movable | [ कलम ४(१) ] |
| हक्क | right | [ कलम ४(१) ] |
| हक्कमागणी | claim | [ कलम ८८(२) ] |
| हक्कमागणी आयुक्त | claims commissioner | [ कलम २(ग) ] |
| हितसंबंध | interest | [ कलम ३ ] |
| हुकूमनामा | decree | [ कलम ४(२) ] |